परिपत्रक

मुंबई, 11 डिसेंबर १९९५

डिनेचर्ड स्पिरिट रूल्स, १९५२ चे नियम ३५ चे तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र डिनेचर्ड स्पिरिच्युअस प्रिपरेशन रूल्स, १९६३ चे नियम ५ व ६ चे तरतुदीनुसार अनुक्रमे डिएस. ७ नमुन्यातील व डिएसपी. २ तसेच डिएसपी. ३ च्या नमुन्यातील अनुज्ञप्ती मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. स्थानिक मागणीवरून विकृत मद्यार्काचे किरकोळ विक्री व फ्रेंच पॉलिशचे ठोक व किरकोळ विक्रीच्या आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारी ह्या अनुज्ञप्त्या मंजूर करतात. मद्यार्काचा उपयोग फ्रेंच पॉलिश व तत्सम पदार्थ तयार करण्यासाठी येत असला तरी असे निदर्शनास आले आहे की, मद्यार्क मिश्रीत फ्रेंच पॉलिश व तत्सम पदार्थांचा उपयोग गैरमार्गाने पिण्याकरिता होत आहे. काही जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण जास्त आहे. या गैरप्रकारास आळा घालण्यासाठी असे निर्देश देण्यात येत आहे की, अस्तित्वात असलेल्या ह्या अनुज्ञप्तीधारकांच्या व्यवहाराची तपासणी काटेकोरपणे करण्यात यावी व पडताळणी झाल्यावर ह्या अनुज्ञप्त्या चालू ठेवावयाच्या किंवा नाही याबाबत जिल्हाधिकारी यांनी निर्णय घ्यावा.

२. तसेच जिल्ह्यात डिएस. ७, डिएसपी. २ व ३ ह्या नवीन अनुज्ञप्त्या मंजूर करण्यापूर्वी ह्या अनुज्ञप्त्यांची का गरज आहे, ह्याबाबत कोणते निकष लावण्यात आलेत याची शहानिशा करून अभिप्रायासह आयुक्तालयास प्रस्ताव सादर करण्यात यावा. आयुक्तांच्या पूर्व मान्यतेशिवाय नवीन अनुज्ञप्त्या मंजूर करू नये.

३. परिपत्रकाची पोच द्यावी.

[ सुबोध कुमार ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति

१] सर्व जिल्हाधिकारी, सर्वेह.
२] सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
३] सर्व विभागीय उप-आयुक्त.
४] सर्व उप-आयुक्त.
५] सर्व कार्यासन अधिकारी.

चि. म. का. ८. १२.